क्र.ई - 1 / पोउनिबिसं ( अभि.)/ पदोन्नती / 2011/7205.
अपर पोलीस महासंचालक व संचालक,
पोलीस बिनतारी संदेश,महाराष्ट्र
राज्य, पुणे - 8 यांचे कार्यालय.
दिनांक : -11/10 / 2011.

**विषय :-** पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( अभि.) यांना पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश ( अभि.) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्या बाबत.

**संदर्भ** :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील आदेश क्र.पोमसं / 3 - अ / पदो-अभि / पुरवणी / 102/11, दि.27 / 09 / 2011.

***********

**आदेश** :-

उपरोक्त विषय व संदर्भांकित आदेशान्वये , पोलीस बिनतारी संदेश विभागातील खाली नमूद केलेल्या पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( अभि. ) यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या ठिकाणी त्यांनी कार्यभार ग्रहण केल्याच्या दिनांकापासून **पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश ( अभि.)** या पदावर **तात्पुरत्या स्वरुपात** पदोन्नती देऊन नियुक्ती देण्यात येत आहे..

पोलीस उप निरीक्षक बि.सं ( अभि.) पदाची वेतन श्रेणी :- रु.9300-34800 + ग्रे.वे.4300
पोलीस निरीक्षक बि. सं.( अभि.) पदाची वेतन श्रेणी - :- रु.9300-34800 + ग्रे.वे.5000

| **अ. क्र.** | **पोउनिबिसं (अभि.) यांचे नांव व जातीचा प्रवर्ग** | **सध्याच्या नेमणूकीचे ठिकाण / आस्थापना** | **पो नि बि सं ( अभि.) या पदावर तात्पुरत्या पदोन्नतीवरील नेमणुकीचे ठिकाण** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री सय्यद अरिफ अबुतालीब (खुला प्रवर्ग ) | सं व वि विभाग.पुणे संचालक,पो.बि.सं. म.राज्य,पुणे कार्यालय | नवी मुंबई पोलीस आयुक्त नवी मुंबई | रिक्त पदावर |
| 2 | श्री.वेणेगुरकर श्रीकांत अनंत (खुला प्रवर्ग ) | जालना पोलीस अधीक्षक जालना | मुंबई शहर पोलीस उप आयुक्त बि.सं., मुंबई शहर | रिक्त पदावर. |
| 3. | श्री.पल्लेवार विजयकुमार विश्वनाथ (खुला प्रवर्ग ) | फ शाखा.पुणे संचालक,पो.बि.सं. म.राज्य,पुणे कार्यालय | दहशतवाद विरोधी पथक,मुंबई अपर पो महासंचालक, दहशतवाद विरोधी पथक मुंबई | रिक्त पदावर. |
| 4 | श्री.ढोकले रतन खंडेराव ( खुला प्रवर्ग ) | व्ही सॅट ठाणे (कोकण परिक्षेत्र) पो.अधीक्षक , बि सं पश्चिम वि पुणे . | मुंबई शहर पोलीस उप आयुक्त बि.सं., मुंबई शहर | रिक्त पदावर. |
| 5 | श्री साखरे सुनिल कुमार रामलालजी (अनु जाती प्रवर्ग) | बुलढाणा पोलीस अधीक्षक बुलढाणा | भंडारा पोलीस अधीक्षक भंडारा | रिक्त पदावर |

2. उपरोक्त अधिका-याचे पुढील वेतन हे त्यांचे पदोन्नतीवरील नेमणुकीच्या ठिकाणीच काढण्यात येईल, ही बाब लक्षात घेऊन त्यांना पदोन्नतीच्या ठिकाणी हजर होणेसाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे व कार्यमुक्त केल्याचा दिनांक पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसेच या कार्यालयास कळवावा.

3. सदर पोलीस उपनिरीक्षकांना पोलीस निरीक्षक पदावरील तात्पुरती पदोन्नती खालील अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे

(अ) सदर पदोन्नती प्रथम 11 महिने, किंवा शासन व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेकडून निवडसूचीस मान्यता मिळेपर्यत , यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरीता असेल.

(ब) सदर तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधीत पोलीस उपनिरीक्षकांना नियमित पदोन्नतीचे, म्हणजे सेवाज्येष्ठतेचे कोणतेही अधिकारी प्राप्त होणार नाहीत.

4. वर नमूद केलेल्या तात्पुरत्या पदोन्नतीच्या आदेशाधिन पोलीस उप निरीक्षकांना यांचे विरुध्द निलंबन / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असेल किंवा ते शिक्षा भोगत असतील तर त्यांना संबंधीत घटक प्रमुखांनी पदोन्नतीवर न सोडता त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणांची सविस्तर माहिती तात्काळ पोलीस महासंचालक कार्यालयास व या कार्यालयास सादर करावी व पुढील आदेशांची वाट पहावी.

5. उपरोक्त आदेशात नमूद अधिकारी ज्यांचे विरुध्द विभागीय चौकशी प्रलंबित आहे अथवा विभागीय चौकशीत निर्गमित केलेल्यहा सौम्य शिक्षेची अंमलबजावणी अदयाप सुरु झालेली नाही, अशा अधिका-यांना विभागीय चौकशी अंती होणारी शिक्षा पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे लेखी पूर्व संमतीच्या अधीन राहून व असे लेखी पूर्वसंमतीपत्र घेवून मगच पदोन्नतीवर सोडण्यात यावे. असे संमतीपत्र परस्पर पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांचे कार्यालयास दोन प्रतीत (लक्षवेध - कक्ष-3 अ व कक्ष - 11 यांना ) पाठविण्यात यावे व त्याची प्रत संबधित अधिकारी ज्या घटकात तात्पुरत्या पदोन्नतीवर बदलून जात आहेत त्या घटक प्रमुखास देखील पाठवावी.

6. तसेच, उपरोक्त आदेशांमधील जे पोलीस उपनिरीक्षक मागास प्रवर्गातील आहेत त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी झालेली असल्याची खातरजमा करुनच त्यांना पदोन्नतीवर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करावे. ज्या अधिका-यांची जात प्रमाणपत्राची पडताळणी झालेली नाही त्यांना संबंधीत घटक प्रमुखांनी " **पदोन्नतीवर न सोडता** " त्यांच्या प्रकरणाची सविस्तर माहिती या कार्यालयास तात्काळ पाठवावी व पुढील आदेशांची वाट पहावी.

7. मा.उच्च न्यायालय, याचिका क्रमांक 8452 / 2004 च्या अंतिम निर्णयाचे अधीन राहून व त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभाग,क्र.बीसीसी 2001 /1887/प्र.क्र.64/01/16ब, दि.13/3/2007 या पत्रान्वये निर्देश दिलेले असल्याने त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण मुंबई खंडपीठापूढे दाखल केलेला मुळ अर्ज क्र.1180/2010 मध्ये मा.न्यायालयाचे अंतिम निर्णयाचे अधिनस्त राहून पदोन्नत्या देण्यात येत आहे.

8 सदर पदोन्नती आदेशांमधील पोलीस उपनिरीक्षक हे जर उपरोक्त आदेशांमध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये कार्यरत नसतील तर ते ज्या घटकात कार्यरत आहेत. त्यांनी त्यांना

पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे व तसे या कार्यालयास न चुकता कळवावे. पदोन्नत झालेल्या पोलीस उप निरीक्षक बिनतारी संदेश ( अभि.) यांनी त्यांचे पदाचा कार्यभार संबंधित आस्थापनेवरील वरिष्ठ स.पो.उ.नि.बि.सं.( रेडिओ यांत्रिकी ) यांचे कडे सुपूर्त करावा.

**9. मा.पोलीस महासंचालक यांनी पदोन्नत अधिका-याचे अभिनंदन केले असून त्यांना शुभेच्छा दिलेल्या आहेत.**

(sd /-)

( पि.पा.प्र.शर्मा )

अपर पोलीस महासंचालक व<br>संचालक , पोलीस बिनतारी<br>संदेश, महाराष्ट्र राज्य , पुणे -8 .

प्रति,

पोलीस आयुक्त , मुंबई / पोलीस आयुक्त, नवी मुंबई<br>पोलीस उप आयुक्त, बि.सं.विभाग मुंबई शहर<br>पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे (हस्ते)<br>पोलीस अधिक्षक बिनतारी संदेश, पूर्व विभाग, नागपूर.<br>पोलीस अधीक्षक , बुलढाणा / भंडारा/ सातारा/ सोलापूर ग्रा, सोलापूर/जालना<br>पोलीस उप अधीक्षक बि.सं.कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई / अमरावती परिक्षेत्र /नागपूर परिक्षेत्र नागपूर

प्रत सादर - मा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- सहाय्यक पो.आयुक्त , बि.सं.नियंत्रण कक्ष ,मुंबई<br>पो नि बि सं बुलढाणा / भंडारा

स्थानिक प्रती :-

पोलीस अधीक्षक बिनतारी संदेश, मुख्यालय, पुणे.<br>पोलीस उप अधीक्षक , संशोधन व विकास विभाग, / व्ही.सॅट पुणे (हस्ते)<br>गृह पोलीस निरिक्षक बिनतारी संदेश, संचालक कार्यालय, पुणे

2/- श्री सय्यद पोउपनि बि सं (अभि) सं व वि पुणे यांचे पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री सुंबे, पोउपनि बि सं (अभि) सं व वि पुणे हे सांभाळतील आणि श्री पल्लेवार पोउपनि बि सं (अभि) फ शाखा यांचे रिक्त पदाचा अति कार्यभार श्री अत्रे, पोउपनि बि सं (अभि) हे सांभाळतील.

कार्यालय अधिक्षक / स्वीय सहाय्यक / लघुलेखक<br>प्रमुख लिपिक - 2 आस्थापना शाखा / प्रशासन शाखा / लेखाशाखा<br>''क'' शाखा - प्रसिध्दी साठी ( 2 प्रतीत ) / ''फ'' शाखा / नियोजन कक्ष /<br>भरती कक्ष / आ-फाईल.